# DARJEELING ROPEWAY CO LTD

**104, ShreejeeDarshan, Tata Road No. 2, Opera House, Mumbai - 400004**
**E-mail id:** info@darjeelingropeway.com , daropeway@outlook.com
**Website:** www.darjeelingropeway.com
**CIN: L45202MH1936PLC294011, Tel No.: +91 6358262367**

**21st May, 2019**

To,
The Listing Department,
**BSE Limited**
P.J. Towers,
Dalal Street,
Fort
Mumbai – 400 001

**Scrip Code: 539770**
**Scrip Id: DARJEELING**

Dear Sir/ Madam,

**Subject: Newspaper Clipping of Outcome of Board Meeting held on 20th May, 2019.**

Pursuant to regulation 33 of SEBI (LODR) Regulations, 2015, we hereby inform you that the Board of Directors at their meeting held on **Monday, 20th May, 2019** have inter-alia considered, approved the audited financial results for the quarter and year ended 31st March, 2019.

In continuation to the same, the newspaper clipping duly published in English Newspaper (All Edition) and Marathi Newspaper (Mumbai Edition) dated 21st May, 2019 is enclosed herewith.

This is for your information and records.

Thanking You,

**For Darjeeling Ropeway Company Limited**

H. R. Shah

**Himanshu Shah**
**Managing Director**
**DIN: 08198016**

Darjeeling Ropeway Company Limited

## टँकरमाफीयांमुळे मुंबईत पाणी टंचाई -मिलिंद देवरा



■ **मुंबई**

आशिया खंडातील सर्वात श्रीमंत असलेल्या मुंबई महानगरपालिकेकडून मुंबईकरांना पुरेसा पाणी पुरवठा होत नाही. प्रदूषित पाणी प्यायला मिळते पण मुंबईकरांचे पाणी टँकर माफिया पळवतात. व मुंबईकरांनाच ते विकतात व गब्बर होतात. या टँकर माफियांवर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी काल इशान्य मुंबईचे काँग्रेसचे उमेदवार व मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष मिलिंद देवरा यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने पालिकेचे नवनियुक्त आयुक्त प्रवीण परदेशी यांची भेट घेऊन केली व तसे पत्रकारांना सांगितले. पाण्याच्या प्रश्नावर आम्ही संघर्ष करणार असल्याचेही मिलिंद देवरा यांनी सांगितले.

पाणी माफीयाच्या टँकरचा मुद्दा अधिक स्पष्ट करताना मिलींद देवरा म्हणाले की, कुलाबा, पवई विभागातील टँकर माफियांची यादी आमदार नसिम खान यांनी पालिकेला दिली आहे. पण पालिकेने त्यावर कोणतीही कारवाई केली नाही, असे सांगून या प्रश्नांवर आमचे कार्यकर्ते पुढे येतील व संघर्ष करतील, असे मिलिंद देवरा यांनी सांगितले. मुंबई शहरात २४ तास पाणी पुरवठा करण्यासंदर्भात पालिका प्रशासन भेदभाव करीत असल्याचा आरोपही मिलिंद देवरा यांनी केला. पालिका टॉवरमधील रहिवाशांना २४ तास पाणी पुरवठा करते पण झोपडपट्टीवासिय तसेच चाळीतील रहिवाशांना मात्र केवळ २ किंवा ३ तास पाणी पुरवठा करते. हा भेदभाव आहे तो संपायला हवा,असे सांगून मुंबईकरांना अनेक समस्यानी ग्रासले आहे.पण आम्ही पाण्याच्या प्रश्नाला प्रथम प्राधान्य दिले आहे. पाण्याची समस्या दूर करा. इथे आम्ही आयुक्त प्रवीण परदेशी यांना सांगितले आहे. परदेशी हे चांगले अधिकारी आहेत त्यांना हे प्रश्न सोडविण्यासाठी मुंबई काँग्रेस त्यांना साथ देईल, असेही मिलिंद देवरा म्हणाले. यात आम्हाला राजकारण करायचे नाही, असेही ते म्हणाले.

आयुक्तांनी ७० टक्के नालेसफाई झाल्याचा दावा केला आहे, अशी माहिती शिष्टमंडळातील आमदार अमीन पटेल यांनी सांगितले. पण पालिकेने केवळ वरवरचा कचरा नाल्यातून काढला आहे. आतला गाळ काढला नाही, असे सांगून १००टक्के नाल्याची सफाई झाली पाहिजे, अशी मागणीही आम्ही आयुक्तांनी केली. तेव्हा त्यांनी ती स्वत: नाल्यांची पाहणी करायला जाणार असल्याचे सांगितले.

मिलिंद देवरा यांनी सुरुवातीलाच निवडणूक पोल संदर्भात प्रश्न विचारु नका, तरीही पत्रकारांनी जाहीर झालेल्या निवडक पोली संदर्भात प्रश्न विचारला तेव्हा ते म्हणाले की २००४ पासून ४ निवडणुका लढविल्या यात विधानसभा पालिकेच्याही निवडणुकाही आल्या. पण कुठलेच निवडणूक पोल पाहिले नाहीत. माझा पोलवर विश्वास नाही, ऑस्ट्रेलियाच्या पतप्रधानांचे उदाहरण त्यांनी यावेळी दिले. शिष्टमंडळात पालिकेतील विरोधी पक्षनेते रवि राजा, आमदार अमीन पटेल, भाई जगताप, नसिन खान, माजी आमदार अशोक जाधव, चरण सिंह साप्रा, मधू चव्हाण, व नगरसेवक उपस्थित होते.

# ...तर मुंबईचा शहर भाग आज अंधारात गेला असता


## बेस्टचा विद्युत विभागही आर्थिक गर्तेत ;एक हप्ता भरून बेस्ट कारवाईची नामुष्की टाळणार

### पालिका आयुक्तांची मध्यस्थी

दरम्यान, वीज खंडितची नामुष्की टाळण्यासाठी बेस्ट समिती सदस्यांनी सभात्याग करून समितीचे अध्यक्ष अनिल पाटणकर यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी मुख्यालयात महापालिका आयुक्त प्रवीण परदेशी यांची भेट घेतली. त्यांनी टाटाचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक सिन्हा यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली. येत्या ८-१० दिवसांत १२८ कोटीचे पाहिले बिल भरतो व त्यानंतर एक महिन्याने उर्वरित बिल भरूअसे त्यांना सांगितले. आयुक्तांची विनंती सिन्हा यांनी मान्य केली त्यामुळे स मुंबई शहर भागातील २१० लाख वीज ग्राहकांना दिलासा मिळाला आहे.

### बिलाची रक्कम जाते कुठे?

टाटा कंपनीकडून घेतलेली वीज बेस्ट ग्राहकांना पुरवते. मुंबई शहरात बेस्टचे १० लाख वीजग्राहक आहेत. ते नियमितपणे वीजबिल भरतात. थकबाकीदारांकडून दंडासह वीजबिल वसूल केले जाते. असे असताना टाटाचे ५६१.५७ कोटी रुपये थकीत असतील तर ग्राहकांचा पैसा जातो कुठे, असा प्रश्न समिती सदस्य सुनील गणाचार्य यांनी केला. मात्र त्यावर उपमहाव्यवस्थापक आर. जे. सिंह समाधानकारक खुलासा करू शकले नाहीत.



■ **मुंबई**

आर्थिक गर्तेत सापडलेल्या बेस्टच्या परिवहन विभागाला ऊर्जा देणारा विद्युत विभागच आता संकटात सापडला आहे. थकीत विजेची रक्कम टाटाला न दिल्यास विद्युत पुरवठाच आज खंडित करण्याचा इशारा टाटा वीज कंपनीने दिला आहे. टाटाची ५६१.५७ कोटींची थकबाकी भरली नाही तर टाटा कडून आज वीज पुरवठा केला जाणार नाही तर परिणामी मुंबई शहर आज अंधारात बुडण्याची भीती आहे.

दरम्यान बेस्टचे उपमहाव्यवस्थापक आर. जे. सिंह यांनी टाटा विद्युत कंपनीबरोबर बोलणी सुरू असून तशी वेळ येणार नाही, असा दिलासा दिला असला तरी टाटाने वीज पुरवठा करणार कायम करण्याचे आश्वासन दिले नसल्याने प्रशासनाचा निषेध म्हणून समिती सदस्यांनी झटपट सभा तहकुबी मांडली पण नियमानुसार झटपट तहकुबी मांडता येत नसल्याचे बेस्ट सचिवांनी सांगितल्याने बेस्ट समितीच्या सर्व सदस्यांनी सभात्याग केला.

गेली अनेक वर्षे बेस्टचा परिवहन विभाग तोट्यात आहे. त्याला सावरण्यासाठी विद्युत विभाग सतत पुढाकार घेत असतो. मात्र विद्युत विभागच आता आर्थिक संकटात सापडला आहे. डिसेंबर २०१८ पासून एप्रिल २०१९ पर्यंत पाच महिन्यांचे टाटा वीज कंपनीला ५६१.५७ कोटी रुपये बेस्ट देणे लागते. ही रक्कम न भरल्यास २१ मेपासून वीज पुरवठा खंडित करण्याचा इशारा टाटा वीज कंपनीने बेस्टला दिला आहे. या इशाऱ्याचे पत्र (नोटीस) टाटा वीज कंपनीने १४ मे रोजी बेस्ट प्रशासनाला पाठविले. मात्र प्रशासनाने याबाबत बेस्ट समिती अध्यक्ष अथवा सदस्यांना कोणतीही महिती दिली नाही. काल बेस्ट समितीची सभा सुरू होताच जेष्ठ सदस्य आशिष चेंबूरकर यांनी टाटा च्या थकबाकी संदर्भातील विषय उपस्थित केला. त्याच्या निषेधार्थ आशीष चेंबूरकर, अनिल कोकीळ, नाना आंबोले या बेस्टच्या माजी अध्यक्षांनी आणि सदस्य राष्टावादीचे सुनील अहिर, भाजपचे सुनील गणाचार्य, श्रीकांत कवठणकर यांनी महाव्यवस्थापक सुरेंद्रकुमार बागडे यांच्यावर टीकेची झोड उठविली.

टाटा कंपनीने बेस्टची वीज तोडली तर तो बेस्टच्या इतिहासातील काळा दिवस असेल. महाव्यवस्थापकांची समितीच्या विरोधात कारस्थाने सुरू आहेत. काही प्रश्नांबाबत समितीला न विचारता थेट नगरविकास खात्याकडून परवानगी घेऊन महाव्यवस्थापक समितीचे खच्चीकरण करू पाहत आहेत. बेस्टची लाज वेशीवर टांगण्याचा प्रयत्न आहे, अशा शब्दांत समिती सदस्यांकडून महाव्यवस्थापकांचा निषेध करण्यात आला.

बेस्टवर आर्थिक संकट कोसळले असताना आणि संपूर्ण मुंबई काळोखात बुडण्याची भीती असताना महाव्यवस्थापक सुरेंद्रकुमार बागडे अमेरिकावारीवर आहेत. त्यांच्या गैरहजेरीत ज्यांच्यावर जबाबदारी सोपविली आहे त्या पाालिका अतिरिक्त आयुक्त अश्विनी जोशी पालिकेतील काही महत्त्वाच्या कामांमुळे समितीच्या सभेला गैरहजर होत्या. या सर्वाची जबाबदारी उपमहाव्यवस्थापक आर. जे. सिंह यांच्यावर येऊन पडली. मात्र त्यांनी आपल्या कुवतीच्या बाहेरचे हे काम असल्याचे कबूल करत वीजपुरवठा खंडित होऊ नये यासाठी प्रयत्न चालू असल्याचे सांगितले. ही

बाब महाव्यवस्थापक डॉ.सुरेंद्रकुमार बागडे यांनाही कळवली आहे तेही टाटा कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधता आहेत असे सांगून १२८ कोटीचे पाहिले बिल १-२ दिवसात भरण्यात येणार आहे. उर्वरित रक्कम टप्याटप्प्यात भरण्यात येणार आहे. तशा प्रकारची बोलणी टाटाचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक सिन्हा यांच्याबरोबर झाली आली आहे. विद्युतपुरवठा खंडित करू नये अशी विनंतीही त्यांना करण्यात आली आहे. उपमहाव्यवस्थापक आर. जे. सिंह यांनी सांगितले.

## पालिका कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांसंदर्भात नवनिर्वाचित आयुक्त कामगार नेत्यांशी करणार चर्चा



*मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तपदी नव्याने नियुक्त झालेले प्रवीण परदेशी यांचा सत्कार समन्वय समितीचे अध्यक्ष बाबा कदम यांच्याहस्ते करण्यात आला. तदप्रसंगी महानगरपालिका कामगार कर्मचाऱ्यांना भेडसावणारे प्रश्न उदा. बायोमेट्रिक, आरोग्य विमा योजना व वेतन आयोगातील त्रुटी दूर करण्यासाठी नियुक्त केलेल्या झा समिती बाबतचे निवेदन आयुक्तांना देण्यात आले. सोबत युनियनचे सरचिटणीस सत्यवान जावकर, समन्वय समितीचे सदस्य उपस्थित होते.*

**प्रतिनिधी**

मुंबई, मंगळवार : काल मुंबई महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना समन्वय समितीच्या कामगार नेत्यांनी नवनिर्वाचित आयुक्त प्रवीण परदेशी यांची भेट घेतली व कामगारांच्या प्रश्नांसंबंधीचे निवेदन त्यांना दिले. या प्रश्नांवर प्रशासनाने विनाविलंब निर्णय घेऊन योग्य ती कार्यवाही करावी, अन्यथा कामगार कर्मचाऱ्यांमध्ये असलेल्या असंतोषाचे रुपांतर आंदोलनात होवून औद्योगिक शांतता भंग पावल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनावर राहील याची नोंद घ्यावी असे स्पष्ट नमूद करून या सर्व प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी प्रत्यक्ष भेटीची वेळ आयुक्तांकडे मागितली आहे.

कामगार नेते अॅड. सुखदेव काशिंद, अॅड. महाबळ शेट्टी, वामन कविस्कर, बाबा कदम, सत्यवान जावकर, अॅड. प्रकाश देवदास व बा.शि. साळवी, सुभाष पवार, व दिवाकर दळवी, के.पी.नाईक, साईनाथ राज्याध्यक्ष, सुर्यकांत पेडणेकर, के.के.सिंह याच कामगार नेत्यांचा या शिष्टमंडळात समावेश होता. प्रशासनाने सुरू केलेली बायोमेट्रिक हजेरी पद्धती सदोष असून त्यामध्ये त्रुटी व उणीवा आहेत. काही ठिकाणी लावण्यात आलेल्या मशिन्स या नादुरुस्त आहेत. किंवा लावण्यात आलेल्या मशिन्सना कनेक्टीव्हीटी मिळत नसल्याने कामावर उपस्थित असूनही कामगार कर्मचाऱ्यांची गैरहजेरी लागते. परिणामी त्यांचे खाडे धरले जातात. किंवा सी.एल.भरून द्यावी लागते. हा कामगार कर्मचाऱ्यांवरचा अन्याय आहे. प्रशासनाने बायोमेट्रीक प्रणालीमध्ये असणाऱ्या त्रुटी व उणीवा दूर करून योग्य प्रकारची बायोमट्रिक प्रणाली कार्यान्वित होईपर्यंत कामगार कर्मचाऱ्यांचे वेतन बायोमेट्रिक हजेरीशी जोडले जाऊ नये. कामगार कर्मचाऱ्यांसाठी असलेला सामुदायिक गट विमा योजना पूर्वलक्षी प्रभावाने स्थगित केलेल्या दिनांकापासून १ ऑगस्ट २०१५ पासून सुरू करण्याबाबत प्रशासनाला विनंती केली होती. ही गटविमा योजना लवकर सुरू करावी. सहाव्या वेतन आयोगाच्या धर्तीवरील करारामध्ये राहिलेल्या त्रूटी उणीवा दूर करण्यासाठी माजी सनदी अधिकारी रामनाथ झा यांची नियुक्ती प्रशासनाने केली आहे. पण कामकाज सुरू झालेले नाही. ते लवकर सुरू करावे व कामगार कर्मचाऱ्यांच्या प्रतिनिधीसमवेत रामनाथ झा यांच्यासमोर बाजू मांडण्याची संधी द्यावी, आदी मागण्या केल्या आहेत.

## पुन्हा एनडीए सरकार येणार आणि मला केंद्रीय कॅबिनेट मंत्री म्हणून देशसेवेची संधी मिळणार - केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले




■ **मुंबई**

लोकसभा निवडणुकीचे मतदान संपल्यानंतर एक्झिट पोलचे निकाल देशात पुन्हा एनडीए चेच सरकार येणार आणि नरेंद्र मोदी पुन्हा प्रधानमंत्री होणार असे अंदाज व्यक्त करीत आहेत. त्यामुळे देशात पुन्हा एनडीए सरकार येणार आणि मला मोदींच्या मंत्रिमंडळात केंद्रीय कॅबिनेट मंत्री म्हणून देशसेवेची पुन्हा संधी मिळणार असे प्रतीपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी केले.

सफेदपूल तानाजीनगर साकिनाका येथे रिपब्लिकन पक्षाच्या चांदीवली तालुकातर्फे आयोजित संयुक्त जयंती महोत्सवात बोलत होते.महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर, तथागत भगवान बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या संयुक्त जयंती उत्सवाचे आयोजन रिपाइं चांदीवली तालुका अध्यक्ष बापू प्रधान यांनी आयोजन केले होते. यावेळी विचारमंचावर रिपाइंचे मुंबई अध्यक्ष गौतम सोनवणे, हेमंत रणपिसे योगिराज भोसले, संदेश मोरे आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.महाराष्ट्र सरकार ने सन २०११च्या झोपड्या पात्र करणारा कायदा संमत केला आहे. मात्र त्यात वाढ करून सन २०१४पर्यंतच्या झोपड्या अधिकृत करणारा कायदा सरकारने करावा अशी मागणी रिपब्लिकन पक्षाची आहे. एसआरए मध्ये किमान ४५० फुटांचे घर द्यावे अशी मागणीही रिपब्लिकन पक्षाची असल्याचे ना रामदास आठवले म्हणाले.

## उल्हासनगर महापालिकेत सातव्या वेतन आयोगाची मागणी
## १८ कोटीचा पडणार बोजा

■ **उल्हासनगर**

उल्हासनगर महापालिकेत सातव्या वेतन आयोगाच्या मांगणीने जोर धरला असून हा वेतन आयोग लागू केला तर महापालिकेवर १८ कोटीचा भार पडणार आहे . अशी माहिती मुख्य लेखाधिकारी विकास चव्हाण यांनी दिली आहे . आगानी महासभेत सातव्या वेतन आयोगा बाबत प्रस्ताव येण्याची शक्यता आहे. उल्हासनगर महापालिकेची आर्थिक स्थिती अत्यंत कमजोर आहे. निधी अभावी कामे रखडली आहेत. महापालिका सत्ताधाऱ्याना खान्यासाठी बरोबर ठराव करुन करोडो रुपयाचा निधी मंजुर करतात . मात्र कर्मचाऱ्याना सातवा वेतन आयोग लागू करण्यासाठी महापालिकेची आर्थिक स्थिती पुढे करतात . लोकसभा निवडणुकी पुर्वीच कामगार संघटनानी व नगरसेवकानी सातवा वेतन आयोगा बाबत महासभेत प्रस्ताव आणन्याची मांगणी केली होती. केंद्रात व राज्यात सातवा वेतन आयोग लागु झाला आहे . त्यामुळे स्थानिक स्वराज्य सस्थतेत देखिल हा वेतन आयोग लागू करा अशी मागणी जोर धरू लागली आहे . दरम्यान सत्ताधारी व विरोधी पक्ष हे सुद्धा वेतन आयोग लागू करन्याच्या बाजूने आहेत. महापालिकेत कर्मचारी यांचे वेतन आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्त वेतन व खाजगी सुरक्षा रक्षक यांचे वेतन असे एकुण महापालिकेला दर महा ८० कोटी रुपये खर्च आहे . मात्र सातवा वेतन आयोग लागू केला तर १८ कोटीचा अतिरिक्त भार महापालिकेवर येणार आहे . दरम्यान महापालिकेच्या उत्पन्नात सुद्धा घट झाली आहे. त्यामुळे महापालिकेची आर्थिक स्थिती डबघाईला आली आहे.

## एनएमएमटीची रिक्षाला धडक, रिक्षातील ८ वर्षीय मुलीचा मृत्यू, इतर तीन जण जखमी

■ **नवी मुंबई**

उरण मधील कोप्रोली येथून जुईनगरच्या दिशेने येणाऱ्या भरधाव एनएमएमटी बसची रिक्षाला धडक लागल्याने झालेल्या अपघातात रिक्षामधील ८ वर्षीय मुलीचा दुर्दैवी अंत झाल्याची घटना सोमवारी सकाळी खोपटा ब्रिज समोरील चौकात घडली. या अपघातात मृत मुलीच्या आईसह आजी-आजोबा हे तीघे जखमी झाले असून त्यांच्यावर नेरुळ येथील डी.वाय.पाटील रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या अपघातानंतर उरण पोलिसांनी एनएमएमटी बस चालकाला अटक केली आहे. या अपघातात मृत पावलेल्या मुलीचे नाव मुद्रा केदार मंत्री (८वर्षे) असे असून जखमीमध्ये तीची आई तेजश्री केदार मंत्री (३४), आजोबा भालचंद्र म्हात्रे (५६)आजी भावना म्हात्रे (५०) या तीघांचा समावेश आहे. या घटनेतील मृत मुद्रा ही ती डोंबिवली येथे रहाण्यास होती. मुद्राचे आजी आजोबा उरणच्या नागाव येथे रहाण्यास असल्याने ती नुकतीच नागाव येथील आजी-ओजोबांकडे आली होती. सोमवारी सकाळी रिक्षा चालक असलेले भालचंद्र म्हात्रे हे आपल्या रिक्षातून अलिबाग येथे जात होते. यावेळी त्यांच्यासोबत पत्नी भावना,मुलगी तेजश्री व नात मुद्रा हे तीघे होते. सकाळी ८.३० वाजण्याच्या सुमारास त्यांची रिक्षा खोपटा ब्रिज समोरील चौकात आली असताना, कोप्रोली येथून जुईनगर येथे जाणारी ३४ नंबरची एनएमएमटी बस खोपटा ब्रिज उतरून नवघरच्या दिशेने जात होती.

## घाटकोपरमध्ये गोळ्या घालून स्थानिकाची हत्या

■ **मुंबई**

दिवसाढवळ्या मुंबईच्या घाटकोपर परिसरात गोळ्या घालून एका स्थानिकाची हत्या करण्यात आली आहे. या हत्येमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. बबलू दुबे असे हत्या झालेल्या इसमाचे नाव असून घाटकोपरमधील गोळीबार रोड परिसरात ही घटना घडली आहे. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार बबलू दुबे हा गोळीबार रोड परिसरात त्याच्या गाडीजवळ बसला होता. तीन इसम एका रिक्षातून त्या ठिकाणी आले आणि त्यांनी बबलूवर बंदूकीने तीन राऊंड फायर केले. तसेच त्याच्यावर चाकूने वारदेखील केले. हल्ल्यानंतर तीनही मारेकऱ्यांनी तिथून पळ काढला. हल्लेखोर तिथून पळाल्यानंतर त्यावेळी घटनास्थळी उपस्थित असलेल्या स्थानिकांनी दुबे याला राजावाडी रुग्णालयात दाखल केले. रुग्णालयात दुबेला डॉक्टरांनी मृत घोषित केले. बबलूचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे.


**धेनू बिल्डकॉन इन्फ्रा लिमिटेड**

कार्यालय क्र. ४, इमारत क्र. ४, वाहतूक नगर, अंबोली, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०० ०५८.
सीआयएन :L10100MH1909PLC000300
दूर. ७९७७५९९५३५
ई-मेल :dhenubuildcon@gmail.com
वेबसाइट : www.dhenubuiukldconinfra.com

**सूचना**

सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ चे विनियमन २९ अंतर्गत याद्वारे सूचना देण्यात येत आहे की,
दि. ३१.०३.२०१९ रोजी संपलेल तिमाही व वर्षाकरिताच्या लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांवर विचारविनिमय करणे, स्वीकृती देणे व त्यांच्या पटनोंदणीकरिता तसेच अध्यक्षांच्या परवानगीने अन्य विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी मे. धेनू बिल्डकॉन इन्फ्रा लिमिटेडच्या संचालक मंडळाची सभा कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय पत्ता कार्यालय क्र. ४, इमारत क्र. ४, वाहतूक नगर, अंबोली, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०० ०५८ येथे मंगळवार, दि. २८.०५.२०१९ रोजी दु. ३.०० वाजता आयोजित करण्यात येत आहे.
सदर सूचन कंपनीची वेबसाइट www.dhenubuiukldconinfra.com वर तसेच स्टॉक एक्सचेंजची वेबसाइट www.bseindia.com वरही उपलब्ध आहे.

धेनू बिल्डकॉन इन्फ्रा लिमिटेडकरिता
सही/-
विकाश महाऋषी
संचालक

ठिकाण : मुंबई
दिनांक : २०.०५.२०१९



**ॲवान्स टेक्नोलॉजीस लिमिटेड**

सीआयएन : L51900MH1985PLC035210
नोंदणीकृत कार्यालय : कार्यालय क्र. ७, ५ वा मजला, ब्लॉक-ए, अैदून बिल्डींग, १ला धोबी तलाव लेन, मुंबई - ४०० ००२.
दूर. : ९१९९८७०५३७२५
ई-मेल : info@avance.in
avancetechnologiesltd@gmail.com
वेबसाइट : www.avance.in

**सूचना**

सेबी (एलओडीआर) विनियमन, २०१५ चे विनियमन २९ तसेच विनियमन ४७ तरतुदी अंतर्गत याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, दि. ३१ मार्च, २०१९ रोजी संपलेल्या वर्षाकरिता व तिमाहीकरिता कंपनीच्या लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांवर विचारविनिमय करणे व त्यांना मंजुरी देण्याकरिता व अध्यक्षांची मंजूरीसह कोणत्याही अन्य प्रकरणाकरिता कंपनीच्या संचालक मंडळाची सभा बुधवार, दि. २९ मे, २०१९ रोजी आयोजित करण्यात येत आहे.
सदर सूचना कंपनीची वेबसाइट www.avance.in व बीएसई वेबसाइट (www.bseindia.com) वरही उपलब्ध आहे.

ॲवान्स टेक्नोलॉजीस लिमिटेडकरिता
सही/-
श्रीकृष्ण भामिडीपाती
संचालक
डीआयएन : ०२०८३३८४

ठिकाण : मुंबई
दिनांक : २०.०५.२०१९



**PUBLIC NOTICE**

NOTICE is hereby given to the public at large that under the instructions of my client, I am investigating the title of the existing Bldg. 35 of the Society Known as "The Pantnagar Sahyadri C.H.S.Ltd." situated in Pant Nagar MHADA Colony, Ghatkopar (East) , Mumbai 400 075 (for short said society) as my clients have undertaken the work of redevelopment and reconstruction instead and in place of the existing building No.35 of the said Society and have obtained the irrevocable consents of all the members of the said society.

Any person/s / company / firm/s / bank/s / financial institution/s, claiming any right, title and interest of whatsoever nature in respect of the property of the above Society or any part thereof by way of any Deed of Conveyance, Development Agreement, Memorandum of Understanding, Joint Venture Agreement, Power of Attorney, Deed of Assignment, Gift, Lease, Inheritance, Exchange, mortgage, charge, lien, trust, possession, easement, any other Understanding not specifically mentioned herein, attachment or otherwise howsoever may make the same known to the undersigned at his office address given below between 11 a.m. and 5 p.m. on any working day except Sundays and Bank holidays in writing together with the copies of documentary evidence in support thereof, within 14 days from the date of publication of this notice. In default, it will be resumed that there is no such outstanding claim or demand and conclude my investigation accordingly and in such event any claim, right, title, interest or demand of anyone, not intimated to us as aforesaid, shall be deemed to have been waived, abandoned, given up and/or released and my clients shall proceed with the work of redevelopment.

**SCHEDULE-I**

All that the building No.35 having a multi-storeyed structure situated at City Survey No.5662 of Ghatkopar in the registration sub district of Bandra Bombay Suburban District.

Sd/-
**SATHYAM ACHARYA**
Advocate, High Court,
Chamber No.3, 2nd floor, Beaumon Chambers,
N.M. Road, Fort, Mumbai-23.
Place : Mumbai.
Date : 21.05.2019.



**दार्जिलिंग रोपवे कं. लि.**

(सीआयएन : L45202MH1936PLC294011)
नोंदणीकृत कार्यालय : १०४, १ ला मजला, श्रीजी दर्शन, टाटा रोड नं. २, रॉक्सी सिनेमा, ऑपेरा हाऊस, गिरगाव, मुंबई - ४०० ००४. दूरध्वनी : + ९१ ६३५८२६२३६७
ई-मेल : info@darjeelingropeway.com वेबसाइट : www.darjeelingropeway.com
दि. ३१ डिसेंबर, २०१९ रोजी संपलेल्या वर्षाकरिताच्या लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांच्या अहवालाचा सारांश

(रक्कम रु. लाखांत, ईपीएस वगळता)

| तपशील | स्थायी | | |
|---|---|---|---|
| | ३१.०३.२०१९ रोजी संपलेली तिमाही (लेखापरीक्षित) | ३१.०३.२०१९ रोजी संपलेले वर्ष (लेखापरीक्षित) | ३१.१२.२०१८ रोजी संपलेली तिमाही (अलेखापरीक्षित) |
| परिचालनातून एकूण उत्पन्न (निव्वळ) | ४७६.८७ | ५७१.८३ | ३०.०० |
| कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (कर व अपवादात्मक बाबीपूर्व) | ३८.८३ | १२३.३८ | २४.६१ |
| करपूर्व कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबी पश्चात) | ३८.८३ | १२३.३८ | २४.६१ |
| करपश्चात कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबी पश्चात) | २०.५६ | ८७.७५ | १८.१० |
| कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न २०.५६ | ८७.७५ | १८.१० | |
| प्रदानित समभाग भांडवल (प्रत्येकी रु. १०/- चे शेअर्स) | ३०५.०० | ३०५.०० | ३०५.०० |
| उत्पन्न प्रतिशेअर | | | |
| मूलभूत | ०.६७ | २.८८ | ०.५९ |
| सौम्यीकृत | ०.६७ | २.८८ | ०.५९ |

टीप:
१. वरील निर्देशित विवरण हे सेबी (सूची व अन्य विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजेसकडे सादर करण्यात आलेल्या लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांच्या विस्तृत प्रारूपाचा सारांश आहे. तिमाही व वर्षअखेरच्या लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षाचे संपूर्ण प्रारूप स्टॉक एक्सचेंज वेबसाइट www.bseindia.com वर उपलब्ध आहे.
गत वर्षाची आकडेवारी आवश्यकतेनुसार गुनर्गठीत/पुनर्रचित/पुन:वर्गीकृत करण्यात आलेली आहे.

दार्जिलिंग रोपवे कंपनी लिमिटेडकरिता
सही/-
हिमांशू शाह
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन :०८१९८०१६

ठिकाण : मुंबई
दिनांक : २०.०५.२०१९

